अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । सोमवार, दि. १७ जून २०२४ । वर्ष : २२ वे अंक : २५८ वा किंमत : ५ रुपये पाने १२

## सांगोल्यातील शासकीय गोदामात वाहन साहित्याची चोरी

### टेम्पो चालकावर गुन्हा दाखल

सांगोला/प्रतिनिधी

येथील शासकिय धान्य गोदामाच्या पाठीमागे असलेल्या आवारातून चार चाकी वाहनाचे लोखंडी साहित्य चोरून नेत असताना पोलिसांनी टेम्पो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. ही घटना गुरुवारी रात्रीच्या सुमारास सांगोला येथील महात्मा फुले चौकात उघडकिस आली.

या प्रकरणात पोलिसांनी लखन श्रावण शिंदे (वय २७ रा.लक्ष्मीनगर सांगोला) या टेम्पो चालकावर गुन्हा दाखल केला. गुरुवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास त्याने एमएच१४-एझेड-४७८३ या टेम्पोतून धान्य गोदामाच्या पाठीमागील तहसीलदार यांच्या अखत्यारित असलेल्या चारचाकि वाहनाचे लोखंडी पाटे चोरून नेत होता. पोलिसांनी टेम्पो महात्मा फुले चौकात अडविला. तेव्हा त्यात ७ हजार रुपये किमतीचे लोखंडी साहित्य आढळून आले. याप्रकरणी कुमाररवी राजवाडे (रा. सांगोला) यांनी नुकतीच पोलिसात फिर्याद दाखल केली. हवालदार वाकीटोळ पुढील तपास करीत आहेत.

# स्मशानभूमीतून मृत बाळ गायब झाल्याने खळबळ

## हिंस्त्र प्राण्यांनी मृतदेह पळविला की जादू टोण्यासाठी तस्करी केली? संशयाचे दाटले मळभ





- पोलिसांकडून तातडीने चौकशी, मात्र धागादोरा लागेना
- महापालिकेच्या बेफिकीर कारभाराचे पुन्हा निघाले धिंडवडे
- महापालिकेच्या आक्षेपार्ह कारभाराविरोधात सोलापूरकरांमध्ये संतापाची लाट

सोलापूर/प्रतिनिधी

**सोलापूरच्या मोदी स्मशानभूमीत दफण केलेल्या एका दहा महिन्याच्या बालकाचा मृतदेह गायब होण्याचा अत्यंत धक्कादायक अन् गंभीर प्रकार प्रकार रविवारी (ता.१६) सकाळी उघडकीस आला आहे. हिंस्त्र प्राण्यांनी आपल्या भक्षणासाठी हा मृतदेह पळविला की जादू टोळण्याच्या अघोरी प्रकारासाठी या मृतदेहाची तस्करी करण्यात आली? याबद्दल संशयाचे मळभ दाटले आहेत. हा भयावह प्रकार समोर आल्यानंतर पोलीसांनी तातडीने शोध मोहीम हाती घेतली, तथापि या घटनेसंबंधी कोणताच धागादोरा रविवारी रात्री उशीरापर्यंत लागलेला नव्हता. दरम्यान, या घटनेसंदर्भात मोदी स्मशानभूमीधील सुरक्षा रक्षकास कोणताही माहिती नसल्याचीबाबदेखील उघड झाली आहे. सोलापूर महापालिकेच्या बेफिकीर कारभाराचे या प्रकरणाने पुन्हा धिंडवडे निघाले आहेत.**

मिळालेल्या माहितीनुसार, प्रियांश वाघमारे (वय १० हिने) असं मृतदेह गायब झालेल्या बाळाचे नाव आहे. प्रियांशला खेळताना डोक्याला दुखापत झाली होती. त्याला उपचारासाठी सोलापुरातील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. मात्र, उपचारादरम्यान त्याचा परवा शुक्रवारी (ता.१४) रोजी त्याचा मृत्यू झाला होता.

प्रियांश याच्यावर शहरातील मोदी स्मशानभूमीत १४ जून रोजी अंत्यसंस्कार केले होते. त्याच्या मृतदेहाचे येथे दफन केले होते. रविवारी (ता.१६) तिसऱ्या दिवसाचा विधी पार पाडण्यासाठी वाघमारे प्रियांशच्या कुटुंबियांनी त्याच्यावर शहरातील मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले होते. आज रविवारी तिसऱ्या दिवसाचा विधी पार पाडण्यासाठी वाघमारे कुटुंबिय मोदी स्मशान भूमीत सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास पोहचले. यावेळी त्यांना मृतदेह पुरलेल्या ठिकाणी एक खड्डा आढळून आला. त्यातून प्रियांशचा मृतदेह कोणीतरी उकरून नेला असावा, असा संशय वाघमारे कुटुंबियांना आला. यांनी तातडीने या घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे. स्मशानभूमीतून मृतदेह गायब झाल्याने सोलापूर शहर आणि परिसरात खळबळ उडाली आहे. प्रियांशचा मृतदेह जादू टोण्याच्या प्रकारासाठी उकरून नेला असावा, की हिंस्त्र प्राण्यांनी तो भक्षणासाठी पळवला अशी चर्चा परिसरात सुरू आहे. सध्या पोलिसांकडून घटनेचा तपास केला जात आहे.



सोलापूर : मोदी स्मशानात स्नुपी श्वान माग घेताना. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित लकडे घटनास्थळाची पाहणी करताना. प्रियांशच्या नातेवाईकांसमवेत सदर बझार पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी.



“ प्रियांश या माझ्या बाळाला झडका येत असल्याने रुग्णालयात दाखल केले होते. उपचार दरम्यान डॉक्टरांनी ४८ तासाचे टाईम दिले होता. पण माझा प्रियांश शुध्दीवर आला नाही. त्यानंतर आम्ही माझ्या प्रियांशला घरी आणल्यानंतर शुक्रवारी अडीच वाजता मोदी स्मशानभूमीत विधिकार्यसाठी नेले. त्यानंतर सर्व विधि झाल्यानंतर आम्ही निघून आलो. आज सकाळी तिसऱ्या दिवशीच्या कार्यासाठी स्मशानात गेलो असता तेथील दृष्य पाहुन मला धक्काच बसला, त्या ठिकाणी पुरलेला माझ्या बाळाला कोणीतरी काढुन नेल्याचे आम्हा कुटुंबियांना चित्र पहाव्यास मिळाले. या ठिकाणची परिस्थिती पाहता, कोणत्याही प्रकारचे जनावरे दगड उचलून फरशी बाजूला करुन बाळाला घेवून जावु शकत नाही, हे काम फक्त माणूस करु शकतो. या ठिकाणचे चित्र पाहता मृतहेद हा जादू टोण्यासाठी नेल्याचा आमचा संशय आहे.

**- मृणाली रोहन वाघमारे (प्रियांशची आई)**



“ मोदी स्मशानातील प्रकार पाहता माझ्या प्रियांशला कोणत्याही जनावरांनी उचलून नेलेले नाही तर कोणीतरी अघोरी प्रकारासाठी माझ्या प्रियांशचा उपयोग केला असावा असा आमचा संशय आहे. कारण त्या मुलाला खड्ड्यात उतवताना त्याला पांढऱ्या कपड्यांनी त्यास लपटलेला होता. पण आजचे चित्र पाहता, त्या कपड्यातून माझा प्रियांश गायबच होता. कपड्याला कोणत्याही प्रकारचे रक्ताचे डाग त्या कपड्यास लागलेले नव्हते.

**- रोहन वाघमारे (प्रियांशचे वडील)**

### श्वान स्मशानभूमीतच घुटमळले

पोलिस खात्यातील श्वान पथकातील अश्या ‘स्नुपी‘ या श्वानास पोलिसांनी घटनास्थळी पाचरण केले होते. त्या श्वानास त्या मुलाच्या अंगावरील कापडाचा वास देण्यात आला. त्या कापडाचा वास घेतल्यानंतर ते श्वान स्मशान भूमीत घुटमळे त्यास मार्ग मिळाला नाही.

### स्मशानभूमीची सुरक्षा वाऱ्यावर ना सीसीटीव्ही अन् तगडे गार्ड

मोदी स्मशानभूमीची सुरक्षा वाऱ्यावरच आहे. या ठिकाणी सीसीटीव्ही बसवलेले नाहीत. शिवाय पुरेशा प्रमाणात सक्षम सुरक्षा व्यवस्था नाही. हे दोन्ही येथे असते तर मृतदेहाचे नेमके काय झाले, याची माहिती समोर आली असती.



“ शहर गुन्हे प्रकटीकरण व श्वान पथकच्या साह्याने या घटनेचा शोध घेण्याचा प्रयत्न करीत आहोत. या मोदी स्मशान भूमीमध्ये जंगली जनावरांचा वावर पहावयास मिळत आहे. त्या जागेवरील पाहणी केली असता, त्या मुलाच्या अंगावर गुंडाळलेले कापड त्याठिकाणीच पडल्याचे पाहावयास मिळाले ते आम्ही ताब्यात घेतले आहे. आतापर्यत तपासात कोणताही वेगळा प्रकार पहावयास मिळालेला नाही. तपासात पुरावा मिळाल्यास चौकशी करु.

**- अजित लकडे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, सदर बझार पोलीस ठाणे, सोलापूर**

## दोन मोटारसायकलींची समोरासमोर टक्कर

### एक ठार दोन जखमी

बार्शी/प्रतिनिधी

दोन मोटार सायकलची समोरासमोर वेगात टक्कर होऊन एका मोटार सायकल वरील स्वार ठार व इतर दोघे जखमी झाल्याची घटना घडली आहे. हा अपघात बार्शी शहरातून कासारवाडी कडे जाणाऱ्या रस्त्यावरील पुलाजवळ घडला. या अपघातामध्ये शहरातील लहुजी वस्ताद चौक येथे राहणारा अमर राजगुरू शेंडगे( वय ३३) हा युवक मयत तर त्याच्या पाठीमागे बसलेला ईश्वर संतोष रसाळ हा युवक (वय १९) जखमी झाला आहे .हे दोन युवक शहरातील कासारवाडी रस्त्यावरून मालवंडी कडे मोटार सायकल वरून निघाले होते. त्यांची कोरफळे वरून येणाऱ्या अल्ताफ चांद शेख (वय ३५) यांच्या मोटार सायकल बरोबर समोरासमोर धडक बसली. या अपघातामध्ये अल्ताफ शेख हा देखील जखमी झाला आहे. या अपघातामध्ये जखमी युवकांना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर मयताचे शव विच्छेदनासाठी पाठविण्यात आले. या अपघाताचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

## नेते मंडळींच्या लोकसभेतील कर्तृत्वाचे होणार स्कॅनिंग

### सोलापूर अन् माढ्यातील सर्व्हेक्षणाचा जाणार अहवाल

- भाजपकडून निरीक्षकांची नियुक्ती
- दूध का दूध पानी का पानी होणार

सोलापूर/प्रतिनिधी

महायुतीकडून खास करून भाजपकडून पराभव झालेल्या ३३ मतदारसंघांचा आढावा घेतला जाणार आहे. विशेष म्हणजे या ३३ मतदारसंघांसाठी भाजपकडून निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपच्या पक्षश्रेष्ठींकडून २२ जून पूर्वी निरीक्षकांना अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता सोलापूर आणि लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाचे स्कॅनिंग होणार असून अहवालात दूध का दूध आणि पानी पानी समोर येणार आहे. त्यामुळे स्थानिक नेत्यांची आता धाकधूक वाढली आहे. सोलापूरसाठी खासदार धनंजय महाडिक तर माढ्यासाठी अमित साटम यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात पराभव झाल्यानंतर आता भाजप पक्ष सतर्क झाला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर भाजपकडून डॅमेज कंट्रोल केले जात आहे. विधानसभा निवडणुकीत पुन्हा तसा पराभव होऊ नये यासाठी भाजपने मोठी रणनीती आखली आहे. मिळालेल्या माहितीनुसार महायुतीचा पराभव झालेल्या ३३ मतदारसंघांचा भाजपकडून आढावा घेतला जाणार आहे. या भाजपकडून निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षश्रेष्ठींकडून नेमलेल्या निरीक्षकांकडून २२ जून पूर्वी अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.



धनंजय महाडिक



अमित साटम

#### शहर- जिल्ह्यातील आमदारांना धाकधूक

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात महायुतीचे १० आमदर होते. असे असताना जिल्ह्यातील दोन्ही जागेवर भाजपाचा पराभव झाला. विशेष म्हणजे एक अपवाद वगळता प्रत्येक आमदाराच्या मतदारसंघात भाजप उमेदवार पिछाडीवर आहे. त्यामुळे निरीक्षकांची नियुक्ती आणि त्यांचा अहवाल यामुळे आमदारांची धाकधूक वाढली आहे. या अहवालावर त्यांचे आमदारकीच्या तिकिटाचे भवितव्य अवलंबून असणार आहे. त्यामुळे हा अहवाल आमदार आणि त्यांच्या समर्थकांचा काळजी वाढवणार असणार आहे.

#### निरीक्षक या बाबी तपासणार

मतदारसंघात महायुतीमध्ये समन्वय होता की नाही? अंतर्गत गटबाजीचा कुठे-कुठे फटका बसला? प्रचारात भाजपचे कोणकोणते नेते सक्रिय होते, कोण दूर राहिले? आमदारांच्या मतदारसंघात भाजप मागे का राहिला ? आमदारांनी खरोखरच काम केले की नाही ? या सर्व बाबींची माहिती निरीक्षक घेणार आहेत.

#### कोणत्या मतदारसंघात कोण निरीक्षक ?


सोलापूर-खा. धनंजय महाडिक, माढा- अमित साटम, नांदेड - राधाकृष्ण विखे पाटील, बारामती- मंगलप्रभात लोढा, चंद्रपूर - श्रीकांत भारतीय, जालना-चंद्रकांत पाटील बीड- खा. अनिल बोंडे, रामटेक- प्रतापराव पाटील चिखलीकर, अमरावती-आशिष देशमुख, वर्धा -प्रवीण दटके, भंडारा-गोंदियामध्ये रणजित पाटील, यवतमाळ-वाशिम -आकाश फुंडकर, दिंडोरी-विजया रहाटकर, हिंगोली- संजय कुटे, उत्तर-पश्चिम मुंबई - सुनील कर्जतकर, दक्षिण मुंबई -माधवी नाईक, उत्तर-मध्य मुंबई- हर्षवर्धन पाटील, उत्तर-पूर्व मुंबई- राणा जगजितसिंह, मावळ- प्रवीण दरेकर, अहमदनगर -मेधा कुलकर्णी, भिवंडी -सुनील कर्जतकर.

## रिक्षा उलटून प्रवासी जखमी

सोलापूर : रिक्षा उलटल्याने संतोष रामचंद्र मस्के (वय ३० रा. राजीवनगर, मुकुंदनगर) हा तरुण जखमी झाला. रविवारी (दि.१६) दुपारी २ वाजेच्या सुमारात तो विजापूर रस्त्यावरुन मुकुंदनगर येथे रिक्षातून निघाला होता. पत्रकारभवनजवळ रिक्षा उलटल्याने गंभीर जखमी झाला.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे





कल्पना चांगली आहे, पण..!

# सभापतीपदावरून घमासान; काँग्रेसने एनडीएचे टेन्शन वाढवले

नवी दिल्ली

**लोकसभेच्या सभापतीपदाच्या निवडीवरून सत्ताधारी एनडीए आणि विरोधी इंडिया या पक्षांमध्ये शहकाटशहचे राजकारण सुरू झाले आहे. सभापती कोणत्या पक्षाचा निवडायचा हा सर्वस्वी निर्णय एनडीएचा असताना इंडिया आघाडीच्या नेत्यांनी सभापतीपदासाठी एनडीएचा घटक पक्ष असलेल्या तेलुगू देशम पार्टीला पाठिंबा देण्याचे सूतोवाच केल्याने एनडीएच्या नेत्यांची डोकेदुखी वाढली आहे.**





सभापतीपदाची निवडणूक २६ जून रोजी होणार आहे. अशा परिस्थितीत सभापतीपदावरून एनडीए आणि इंडिया आघाडीतील पक्षांमध्ये शाब्दिक हल्ले सुरुच आहेत. इंडिया आघाडीच्या नेत्यांनी या पदासाठी एनडीएचा घटक पक्ष असलेल्या टीडीपीला पाठिंबा देण्याची घोषणा केली आहे. दुसरीकडे नितीश कुमार यांच्या जेडीयूने आपले इरादे स्पष्ट केले आहेत.

जेडीयूचे राष्ट्रीय सरचिटणीस केसी त्यागी यांनी सांगितले की, ‘‘काँग्रेस जे काही करत आहे ते लक्ष विचलित करत आहे, ते चुकीचे आहे. कारण परंपरा अशी आहे की सत्ताधारी आघाडीतील सर्वात मोठा पक्षच स्पीकरबाबत निर्णय घेतो. भाजप कोणताही निर्णय घेईल, आम्ही त्याचे समर्थन करू.



### एनडीएची संख्या किती?

एनडीए सरकारसाठी टीडीपी आणि जेडीयूचा पाठिंबा खूप महत्वाचा आहे, कारण लोकसभा निवडणुकीत भाजपला २४० जागा मिळाल्या आहेत, जे बहुमताच्या २७२ च्या आकड्यापेक्षा कमी आहे. याशिवाय टीडीपीला १६, तर जेडीयूला १२ जागा मिळाल्या आहेत. त्यानंतरच एनडीएला पूर्ण बहुमत मिळाले आहे.

### १९९९ मध्ये काय झाले?

१९९९ मध्ये, जयललिता यांच्या नेतृत्वाखालील वाजपेयी सरकारचा पाठिंबा काढून घेतला होता. त्यानंतर वाजपेयींच्या नेतृत्वाखालील सरकार एका मताने पडले. कारण बालयोगी यांनी अध्यक्ष म्हणून ओडिशाचे तत्कालीन काँग्रेस मुख्यमंत्री गिरीधर यांना मतदान केले होते. तीन महिन्यांपूर्वीच ते मुख्यमंत्री झाले होते, मात्र, तोपर्यंत त्यांनी खासदारकीचा राजीनामा दिला नव्हता.

### भाजपसाठी हे पद का महत्वाचे?

टीडीपीने सभापतींच्या खुर्चीवर आपला दावा करण्याचा पर्याय नाकारला नाही. अशा स्थितीत जेडीयूच्या भूमिकेमुळे भाजपची स्थिती मजबूत झाली आहे. भाजप पक्षाला सभापतीपद आपल्या उमेदवारासाठी ठेवायचे आहे आणि त्यांनी आपल्या मित्रपक्षांशीही याबाबत चर्चा केली आहे. कारण १९९९ मध्ये भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार सत्तेत होते आणि त्या काळात सरकारला विश्वासदर्शक ठरावातून जावे लागले होते, जे ते संसदेत करू शकले नाही. त्यावेळी टीडीपीचे खासदार जीएम सी बालयोगी स्पीकर होते.सभापती आपल्या पक्षाचा झाल्यास हवे निर्णय घेवू शकतो,अशी भाजपची रणनीती आहे.

### तेलुगू देशमची भूमिका काय?

लोकसभा अध्यक्षांबद्दल, तेलुगू देशमने म्हटले आहे की, सत्ताधारी आघाडीने सभापतीपदासाठी उमेदवार उभा केला पाहिजे. टीडीपीचे राष्ट्रीय प्रवक्ते पट्टाभी राम कोमरेड्डी यांनी सांगितले की, ‘‘सभापतीपदाच्या निवडणुकीबाबत एनडीएचे सहयोगी एकत्र बसतील आणि सभापतीपदाचा उमेदवार कोण असेल याचा निर्णय घेतील. एकदा एकमत झाले की आम्ही तो उमेदवार उभा करू आणि टीडीपीसह सर्व मित्र पक्ष उमेदवाराला पाठिंबा देतील.